# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18
## अ प्रभाग समितीची विशेष सभा(अंदाजपत्रकीय)
## सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक 11 ]

**दिनांक : 15/2/2020** **वेळ : सकाळी 11.00 वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाचे सन 2019-20 चे सुधारित व सन 2020-21 चे मुळ अंदाजपत्रकासंबंधी अ प्रभाग समितीची विशेष सभा शनिवार दि.15/2/2020 रोजी सकाळी 11.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.शर्मिला राजू बाबर | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्य |
| 3. | मा.जावेद रमजान शेख | सदस्य |
| 4. | मा.मीनल विशाल यादव | सदस्या |
| 5. | मा.शैलजा अविनाश मोरे | सदस्या |
| 6. | मा.अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 7. | मा.कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |
| 8. | मा.कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीम. आशादेवी दुरगुडे –मा. क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री. रविंद्र पवार – मा. कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.श्री. दशरथ कांबळे–प्रशासन अधिकारी तथा सचिव(सभाशाखा) मा.श्री मोहन निकम-लेखाधिकारी, मा.श्री. शिवाजी चौरे उपअभियंता (स्थापत्य्), मा.श्री. सुर्यकांत मोहिते-उपअभियंता(स्थापत्य्, ) मा.श्री. दिपक कुंभार– उपअभियंता(पाणी पुरवठा), मा.श्री. सुभाष काळे(उपअभियंता जल:निस्सारण), मा.श्री. महादेव शिंदे– सहा.आरोग्याधिकारी, श्री. लक्ष्मण डगळे, मुख्य् लिपिक, श्री. पगार एस.जी.-जनरेटर ऑपरेटर इ. पदाधिकारी/अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

मा. सभापती, श्रीमती शर्मिला राजू बाबर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली. मा. क्षेत्रीय अधिकारी, श्रीमती आशादेवी दुरगुडे यांनी अ क्षेत्रीय कार्यालयाचे सन 2019-20 चे सुधारित व सन 2020-21 चे मुळ अंदाजपत्रक मा. प्रभाग समितीसमोर अवलोकनार्थ सादर केले.

(कृ.मा.प.)

ठराव क्रमांक 28 | विषय क्रमांक 1
दिनांक 15/2/2020 | विभाग : लेखा
सुचक: मा. अनुराधा गोरखे | अनुमोदक : मा.शर्मिला बाबर

संदर्भ:-मा. क्षेत्रीय अधिकारी, अ क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील पत्र क्रमांक अक्षेका/लेखा/कावि/45/2020 दिनांक 13/2/2020 .

अ क्षेत्रीय कार्यालयाचे सन 2019-20 चे सुधारित व सन 2020-21 चे मुळ अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 (सुधारित नांव THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATION ACT (Act No. LIX of 1949) चे कलम २९(अ) मधील कलम ७ चे पोटकलम (ब) नुसार मान्यतेकामी शिफारस करणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

-----------------

तदनंतर मा. शर्मिला राजू बाबर, सभापती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून प्रस्तुतची विशेष सभा संपल्याचे जाहीर केले.

[शर्मिला राजू बाबर]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक- अक्षेका/9/कावि/ 312 /2020 दिनांक- 20 /2/2020

(दशरथ कांबळे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित -----------------------